रेको कम्युनिटी ची स्थापना  : २६ ऑगस्ट २०१३.

रेको कम्युनिटीच्या स्थापनेमागची प्रेरणा :

रेको ट्रान्सफोर्मेर प्रा. लि. मध्ये काम करणारा  कामगार हा त्याचा आर्थिक विकास साधतच आहे . परंतु तो माणूस म्हणून सर्वांगाने विकसित व्हावा सामाजिक , राजकीय , व्यावहारिक, शैक्षणिक विश्वाशी पण तो तितक्याच तत्परतेने जोडला गेला असावा ,एक माणूस म्हणून तो समाजाचे काही देण लागतो , सामाजाप्रतीच्या कर्तव्याची जाणीव त्याला असावी , स्वतःच्या आर्थिक विकासाबरोबर बौद्धिक व शारीरिक विकास पण त्याला साधता यावा. कामाच्या व्यापामुळे पडद्याआड झालेल्या त्याच्या सुप्त कलागुणांना वाव  मिळावा, या सर्व गोष्टींचा कंपनीचे सर्वेसर्वा श्रीयुत रवींद्र वझे सर यांनी बारकाईने विचार केला  व एक असे हक्काचे व्यासपीठ असावे कि ज्यामुळे या सगळ्या गोष्टी साध्य व्हाव्या हि कल्पना त्यांना सुचली आणि " रेको कम्युनिटी " या उपक्रमाची सुरवात केली.या व्यासपिठाअंतर्गत  सामाजिक , राजकीय , व्यावहारिक, शैक्षणिक , कला क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन , विविध  शारीरिक , बौद्धिक खेळ , रेको

ग्रंथालय , सुविचार या सर्व बाबींचा समावेश असेल.आपल्याकडून काही  नवीन संकल्पना असतील तर त्यांचेही स्वागत आहे.आज लावलेल्या रोपट्याचा वेल उद्या गगनावरी जाईल यात शंका नाही.